आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता
४ नोव्हेंबर २०२६ - बुधवार

ठळक बातम्या

- सर्व अग्नीवीरांना सैन्य दलात सामील करुन घेण्यासाठीच्या योजनेला केंद्र सरकारची मंजुरी

- पाचशे कोटीहून जास्त उलाढाल असलेल्या सहकारी संस्थांच्या समित्यांवर शासनातर्फे ५ सदस्यांची नियुक्ती करण्यात येणार

- यंदाची दिवाळी शेतकऱ्यांसोबत साजरी करणार असल्याची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची माहिती

- अतिरिक्त विक्रीकर किंवा अधिभार आकारण्याचा राज्यांचा अधिकार कायम असल्याचा सर्वोच्च न्यायालयाचा निर्वाळा

आणि

- नवव्या हिरो आशियाई चषक हॉकी स्पर्धेच्या उपान्त्य फेरीत, आज भारताचा सामना दक्षिण कोरियाबरोबर होणार

<><><><><><>

सर्व अग्नीवीरांना सैन्य दलात सामिल करुन घेण्यासाठीच्या योजनेला केंद्र सरकारनं आज मंजुरी दिली. सध्याच्या योजनेनुसार ४ वर्षाचा कालावधी पूर्ण झाल्यावर २५ टक्के अग्नीवीरांना सैन्य दलात सामील केलं जाते. उर्वरित ७५ टक्के अग्निवीरांना सरकारनं २ वर्षांची मुदतवाढ दिली आहे. त्यानंतर यापैकी इच्छुक असलेल्या अग्नीवीरांना सैन्य दलात नियमित स्वरुपात घेतलं जाईल, अशी माहिती सैन्यदल प्रमुख एन. एस. राजा सुब्रमणी यांनी आज नवी दिल्लीत वार्ताहर परिषदेत दिली.

देशात ९२ गीगावॅट क्षमतेच्या ऊर्जा साठवणूक योजनेला केंद्र सरकारनं मंजुरी दिल्याचं माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी सांगितलं. याशिवाय विविध योजनांसाठी योग्य माहिती उपलब्ध व्हावी याकरता सरकारनं सांख्यिकी क्षेत्रात सुधार करणार आहे. बाल लैंगिक अत्याचार आणि बलात्कार पीडितांचे खटले चालवण्याचे साडे आठशे जलदगती न्यायालयाचं सक्षमीकरण करायचा निर्णय सरकारनं घेतल्याची माहितीही वैष्णव यांनी दिली.

<><><><><><>

राज्यातल्या ज्या सहकारी संस्थांची वार्षिक उलाढाल पाचशे कोटीहून जास्त आहे, अशा संस्थांच्या समित्यांवर शासनातर्फे ५ सदस्यांची नियुक्ती करण्यात येणार आहे. त्यासंबंधीचा प्रस्ताव आज मंत्रिमंडळाच्या बैठकीत मंजूर झाला. सहाय्यक निबंधक पदावरचा किंवा समकक्ष अधिकारी, आणि संस्थेच्या कार्याचा अनुभव असणाऱ्या ४ व्यक्तींची नेमणूक समितीवर होणार आहे. या ४ सदस्यांना संचालक मंडळात मताधिकार असेल परंतु, पदाधिकारी पदाची निवडणूक त्यांना लढवता येणार नाही. ही सुधारणा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकाना लागू नसेल.

पशुवैद्यकीय अभ्यासक्रमाच्या अंतिम वर्षात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांच्या आंतरवासिता भत्त्यामध्ये वाढ करण्याचा, वाहनांवरील दंडासाठी अभय योजना राबवण्याचा तसंच वसतिगृहातल्या ओबीसी, विमुक्त जाती भटक्या जमाती आणि विशेष मागास प्रवर्गातल्या विद्यार्थ्यांना निर्वाह भत्त्यात दुपटीहून अधिक वाढ करण्याचा निर्णयही आज घेण्यात आला.

<><><><><><><>

राज्यातल्या दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना सर्वतोपरी मदत देण्याचा प्रयत्न सुरू असून आपण यंदाची दिवाळी शेतकऱ्यांसोबत साजरी करणार असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. ते आज मुंबईत वार्ताहरांशी बोलत होते. आतापर्यंत ७३ लाख दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांच्या खात्यात अग्रीम मदत जमा झाली असून पुढच्या दोन दिवसात ९५ टक्के शेतकऱ्यांच्या खात्यात ही मदत जमा होईल. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमाफी योजनेंतर्गत आतापर्यंत २१ लाख शेतकऱ्यांच्या खात्यात १९ हजार कोटी रुपये जमा झाल्याची माहितीही त्यांनी दिली.

<><><><><><><>

मुंबईत बोरिवली पूर्वेला स्वामी विवेकानंद मार्गावर मुंबई महानगरपालिकेनं आज राबवलेल्या अतिक्रमण निर्मूलन मोहिमेत २७ व्यावसायिक गाळे हटवले. ३ हजार ४०० चौरस मीटर क्षेत्रफळाचा हा भूखंड बेस्ट, अर्थात बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन मंडळाच्या बस स्थानकासाठी आरक्षित आहे.

या प्रकरणी सर्वोच्च न्यायालयानं काल मुंबई महानगरपालिका आयुक्त अश्विनी भिडे यांना नोटीस बजावली होती. तसंच त्यांच्यासह महानगरपालिकेच्या संबंधित अधिकाऱ्यांचं नोव्हेंबर महिन्याचं वेतन रोखून देण्याचे आदेश दिले होते.

<><><><><><><>

हिंगोली जिल्ह्यातले शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे माजी आमदार डॉ. संतोष टारफे यांनी आज शिवसेनेत प्रवेश केला. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ठाणे इथं त्यांचं पक्षात स्वागत केलं. टारफे यांच्यासोबत अनेक पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनीही शिवसेनेत प्रवेश केला.

<><><><><><><>

विक्रीकराच्या टक्केवारीच्या स्वरूपात अतिरिक्त विक्रीकर किंवा अधिभार आकारण्याचा राज्यांचा अधिकार कायम ठेवण्याचा १९७४ मध्ये घटनापीठानं दिलेला निकाल आजही कायम असल्याचं सर्वोच्च न्यायालयानं आज स्पष्ट केलं. या विषयावर फेर विचारासाठी पाठवलेला मुद्दा आता केवळ एक सैद्धांतिक प्रश्न म्हणून उरल्याचं न्यायालयानं म्हटलं आहे.

सरन्यायाधीश सूर्य कांत यांच्या नेतृत्वाखालच्या सात न्यायाधीशांच्या घटनापीठानं एकमतानं असा निर्णय दिला की, सुमारे २७ वर्षांपूर्वी त्यांच्याकडे सोपवण्यात आलेल्या कायदेशीर प्रश्नावर आता निर्णय देण्याची आवश्यकता नाही, कारण ज्या वैधानिक तरतुदींना आव्हान देण्यात आलं होतं, त्या आता बदलल्या गेल्या आहेत किंवा त्यामध्ये सुधारणा करण्यात आली आहे, आणि देशात जीएसटी कायदा लागू झाला आहे.

<><><><><><><>

मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावर काल सीमाशुल्क विभागाच्या अधिकाऱ्यांनी केलेल्या कारवाईत बहरीन इथून आलेल्या दोन प्रवाशांकडून भुकटीच्या स्वरूपातलं १ किलो ६८ ग्रॅम वजनाचं सोनं जप्त केलं. त्याची किंमत अंदाजे २ कोटी रुपये इतकी असून या प्रकरणाचा तपास सुरु असल्याचं संबंधित अधिकाऱ्यांनी सांगितलं.

<><><><><><><>

चोरीला गेलेल्या किंवा हरवलेल्या एकूण १ कोटी ६४ लाख रुपये किमतीच्या वस्तू कालमुंबई पोलिसांनी मूळ मालकांना परत केल्या. या वस्तूंमधे सोन्याचे ११ दागिने, दोन चारचाकी गाड्या, १५ मोटारसायकली आणि ३३२ मोबाईलचा समावेश होता. चोरी किंवा लूटमारीच्या विविध तक्रारींवर कारवाई करताना हा माल जप्त केला होता.

<><><><><><><>

ठाणे शहरात घोडबंदर रोड इथं आज पहाटे एक टेम्पो उलटून झालेल्या अपघातात टेम्पो चालक जखमी झाला. टेम्पोने धडक दिल्यामुळे रस्ते दुभाजकावरचा दिव्याचा खांब पडला आणि टेम्पोमधून रसायनाची गळती झाली. पोलीस आणि आपत्ती व्यवस्थापन पथकानं परिस्थितीवर नियंत्रण मिळवलं. टेम्पो चालकाला रुग्णालयात दाखल केल्याचं संबंधित सूत्रांनी सांगितलं.

<><><><><><><>

समाज माध्यमावर 'पिस्तुलासारखी' सारखी दिसणारी वस्तू प्रदर्शित करून दहशत निर्माण केल्या प्रकरणी लातूर जिल्ह्यातल्या काही तरुणांना काल अहमदपूर पोलिसांनी चौकशीसाठी ताब्यात घेतलं. समाज माध्यमावर या तरुणांच्या हातात दिसणारी वस्तू पिस्तुलासारखा दिसणारा लायटर असल्याचं तपासात आढळून आलं.

युवा पिढीनं समाज माध्यमांचा वापर सकारात्मक कारणांसाठी करावा, क्षणिक प्रसिद्धीच्या नादात कायद्याचं उल्लंघन करू नये, असं पोलिसांचं आवाहन आहे.

<><><><><><><>

शासकीय कामकाजात हलगर्जी, वरिष्ठ अधिकाऱ्यांशी अरेरावी आणि प्रशासकीय नियमांचं उल्लंघन केल्याप्रकरणी पालघर जिल्ह्यातल्या मोखाडा तालुक्यामधल्या धामणशेत ग्रामपंचायतीचे ग्रामपंचायत अधिकारी ज्ञानेश्वर रामदास पाटील यांना निलंबित करण्यात आलं आहे. पालघर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मनोज रानडे यांनी हे आदेश दिले.

<><><><><><><>

डिजिटल अरेस्टच्या नावाखाली एका ज्येष्ठ नागरिकाची फसवणूक केल्याप्रकरणी लातूरच्या सायबर पोलिसांनी काल सहा जणांना अटक केली. मध्यप्रदेश, दिल्ली आणि हरियाणा या तीन राज्यांमधून त्यांना अटक करण्यात आली. न्यायालयानं त्यांना ६ नोव्हेंबरपर्यंत पोलीस कोठडी दिली.

पोलीस अधिकारी, एटीएस आणि सक्तवसुली संचालनालयाचे अधिकारी असल्याचं भासवून संबंधित व्यक्तीवर मानसिक दबाव आणून २८ लाख ५१ हजार ९९९ रुपयांची फसवणूक केल्याचा, तसंच यासाठी बनावट ओळखपत्राचा वापर केल्याचा त्यांच्यावर आरोप आहे.

<><><><><><><>

केंद्र सरकारच्या युवा कार्यक्रम आणि क्रीडा मंत्रालयांतर्गत 'मेरा युवा भारत' अर्थात 'माय भारत'च्या माध्यमातून विकसित भारत युवा संवाद अभियान राबविण्यात येत आहे. या अभियानांतर्गत भंडारा जिल्ह्यात युवा संवाद साधण्यात आला. नवमतदार आणि तरुणाईमध्ये मतदानाविषयी जागरूकता निर्माण करणं, लोकशाही प्रक्रियेचं महत्त्व पटवून देणं आणि जबाबदार नागरिक म्हणून त्यांना सक्रिय सहभागासाठी प्रोत्साहित करणं हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे.

<><><><><><><>

दुर्गम आदिवासी भागातल्या विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर दिवाळीचा आनंद फुलावा, या उद्देशानं भारत विकास परिषदेनं धुळे जिल्ह्यातल्या शिरपूर तालुक्यात टेंभेपाडा इथल्या जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत आज दिवाळी फराळ आणि फटाके वाटपाचा उपक्रम राबवला. या उपक्रमाचा लाभ शाळेतल्या २४० विद्यार्थ्यांना मिळाला.

<><><><><><><>

ज्येष्ठ पत्रकार शेखर जोशी यांचं आज पहाटे डोंबिवली इथं राहत्या घरी आकस्मिक निधन झालं. ते ६० वर्षांचे होते. सकाळ, लोकसत्ता, महाराष्ट्र टाईम्स या प्रकाशनांसाठी त्यांनी वृत्तसंपादन, लेखन तसंच वार्तांकनही केलं होतं. आकाशवाणी मुंबईच्या प्रादेशिक वृत्त विभागातही त्यांनी हंगामी वृत्तनिवेदक आणि भाषांतरकार म्हणून काम केलं होतं.

<><><><><><><>

नवव्या हिरो आशियाई चषक हॉकी स्पर्धेच्या उपान्त्य फेरीत आज भारताचा सामना दक्षिण कोरियाबरोबर होणार आहे. मोहालीच्या बलबीरसिंग हॉकी स्टेडीयमवर हा सामना संध्याकाळी ७ वाजता सुरु होईल. या स्पर्धेत भारताने आतापर्यंतचे सर्व ५ सामने जिंकले आहेत. बाद फेरीतला पहिला सामना दुपारी २ वाजता चीन आणि बांगलादेश यांच्यात पाचव्या स्थानासाठी होईल. उपान्त्य फेरीचा दुसरा सामना जपान आणि मलेशियामधे संध्याकाळी साडेचारवाजता होईल. आज उपान्त्य फेरीत जिंकणाऱ्या संघांमधे उद्या अंतिम लढत रंगेल.

<><><><><><><>

क्रिकेटमधे न्यूझीलंडबरोबरच्या पहिल्या एकदिवसीय सामन्यात भारत विजयाच्या उंबरठ्यावर आहे. ऑकलंड इथं सुरु असलेल्या या सामन्यात भारतानं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करण्याचा निर्णय घेतला. न्यूझीलंडनं सर्व गडी गमावून १८५ धावा केल्या. डकवर्थ

लुईस नियमानुसार भारताला विजयासाठी १४३ धावांचं लक्ष्य मिळालं आहे. शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा भारताच्या २२ षटकात ५ बाद १३८ धावा झाल्या होत्या.

//<><><><><><><>//